Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5402]-101

## M.A. (Part I) (I Semester) EXAMINATION, 2018
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 1
## (व्यावहारिक व उपयोजित मराठी, भाग-1)
## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. शुद्धलेखनाची आवश्यकता स्पष्ट करून मराठीतील शुद्धलेखन विषयक नियम सोदाहरण लिहा.

**किंवा**

खालील उतारा लेखनविषयक नियमांनुसार दुरुस्त करून लिहा :

स्वातत्र्याप्रमाणेच समता हा मानवताधर्माचा दूसरा पेलू आहे व्यक्तिनिष्ठ समदृष्टी म्हणजे समता नाही. सर्वांना समान संधि देणे आणी सबलाकडुन दुर्बलांची पिळवनूक होवू नये अशी सामाजीक दृष्टी म्हणजे समता होय. यामुळे माणवताधर्म समाजीक विषमतेला म्हणजे अस्पृश्यता, जातिवाद, स्त्री-पुरुष इत्यादि भेदाना वीरोध करतो. हे मूल्य कार्ल मार्क्सने विषेशत्वाने जपले आहे. आरक्षन म्हणजे दूर्बलांना संरक्षण देणारी समताच होय.

बंधुता हे मानवतावादाचे तिसरे मूल्य आहे. एका धर्माने दूसऱ्या धर्मियांना, एका समाजाने दुसऱ्या समाजाला बंधुवत वागवावे असे हे मुल्य आहे. यात सवधमसमभाव अनुस्यूत आहे.

2. विविध साहित्यसंस्थांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घ्या.

**किंवा**

साहित्यसंस्थांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या साहित्य संमेलनांच्या स्वरूपाविषयी सविस्तर लिहा.

P.T.O.

3. मुलाखतींचे स्वरूप, तंत्र व कौशल्ये स्पष्ट करून मुलाखतीची पूर्वतयारी कशी कराल ? ते सांगा.

**किंवा**

आकाशवाणीसाठी प्रसिद्ध साहित्यिकाच्या मुलाखतीची प्रश्नसूची तयार करताना कोणकोणत्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक ठरते-ते लिहा.

4. अर्जाचे विविध प्रकार सोदाहरण लिहा.

**किंवा**

पत्रलेखनाचे विविध प्रकार सांगून निमंत्रणपत्र व अभिनंदन पत्राचा नमुना लिहा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) मुद्रितशोधनाची आवश्यकता

(ब) स्मरणिका संपादन

(क) दिवाळी अंकांची उपलब्धता व वाङ्मयीन मूल्य

(ड) मुलाखतीचे विविध प्रकार.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| | |
|---|---|
| **Seat No.** | |

**[5402]-102**

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2018
## MARATHI (मराठी)
### अभ्यासपत्रिका क्र.-2
### [अर्वाचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास (1818 ते 1920)]
### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

**1.** अव्वल इंग्रजी राजवटीतील धार्मिक प्रबोधनाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

अव्वल इंग्रजी कालखंडातील नियतकालिकांचे योगदान स्पष्ट करा.

**2.** ह.ना. आपटेपूर्व कालखंडातील कादंबरीमध्ये सामाजिक स्थित्यंतराचे रेखाटन कसे झाले आहे ते लिहा.

**किंवा**

कृ. प. खाडिलकरांच्या नाट्यलेखनाचा विस्ताराने परिचय करून द्या.

**3.** 1874 ते 1920 या कालखंडातील कथा वाङ्‌मयाची वाटचाल विशद करा.

**किंवा**

गोपाळ गणेश आगरकर यांच्या सुधारणाविषयक विचारांचा परामर्श घ्या.

**4.** वा. म. जोशी यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

बालकवींच्या काव्यलेखनाचा प्रभाव मराठी कवितेवर कसा दिसून येतो ते लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) लोकहितवादींची 'शतपत्रे'

(2) म. फुले यांची 'निर्भिक' संकल्पना

(3) संगीत शारदा – गो. ब. देवल

(4) शि. म. परांजपे यांची लेखनशैली.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

## [5402]-103

**M.A. (Part-I) (First Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-3**

**(भाषाविज्ञान-वर्णनात्मक)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषा म्हणजे काय ? ते सांगून भाषाभ्यास पद्धतींचा परिचय करून द्या.

**किंवा**

भाषेचे उच्चारण व लेखन यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**2.** भाषाभ्यासांच्या विविध कक्षांचा सविस्तर परिचय करून द्या.

**किंवा**

भाषेतील स्वनिम निश्चित करण्याची पद्धती मराठीच्या संदर्भात विशद करा.

**3.** रूपिका, रूपिम आणि रूपिकांतर या संकल्पना स्पष्ट करून त्यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

वाक्यातील प्रथमोपस्थित संघटक म्हणजे काय ? ते सांगून वाक्यपृथक्करणाचे स्वरूप स्पष्ट करा.

P.T.O.

munotes.in

**4.** अर्थाच्या विविध व्याख्या सांगून अर्थाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

अर्थक्षेत्रे ही संकल्पना स्पष्ट करून अनेकार्थता व समानार्थता या विषयी माहिती द्या.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) भाषा आणि भाषण

(*ii*) बलाघात

(*iii*) पूरक विनियोग

(*iv*) रूपांची घटना.

munotes.in

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**9**

| Seat No. | |
|---|---|

**[5402]-104**

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील **पाच** प्रश्नपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) ग्रामीण साहित्य

***किंवा***

(2) मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)

***किंवा***

(3) तौलनिक साहित्याभ्यास

***किंवा***

(4) वाङ्‌मयेतिहास लेखनविद्या

***किंवा***

(5) अलंकार व छंद

munotes.in

**(1) ग्रामीण साहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण साहित्यप्रवाह निर्माण होण्यामागील कारणांची चर्चा करा.

**किंवा**

स्वातंत्र्योत्तर बदलत्या मराठी वाङ्‌मयाचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** 'ग्रामीण' ही संज्ञा स्पष्ट करून ग्रामीण साहित्यातून सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन कसे घडते ते स्पष्ट करा.

**किंवा**

'ग्रामीण साहित्य हेच खरे देशी साहित्य आहे' या विधानाची साधकबाधक चर्चा करा.

**3.** ग्रामीण साहित्यातील वर्गीय जाणिवा आणि कलात्मकता यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

बदलत्या खेड्यांचे चित्रण ग्रामीण साहित्यातून कशा प्रकारे दिसून येते ते सांगा.

**4.** ग्रामीण साहित्यातील ग्रामीण कवितेचे योगदान सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण कादंबरीची स्वरूप-वैशिष्ट्ये विशद करा.

**5.** पुढीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) ग्रामीण साहित्याची भाषा

(2) शंकर पाटलांचे कथालेखन

(3) कृषी औद्योगिक अवस्थांतरे व ग्रामीण साहित्य

(4) गावगाड्याची जडणघडण.

munotes.in

# [5402]-104

## (2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** महाराष्ट्रातील धर्मपंथ व मराठी साहित्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

महाराष्ट्रातील राजवटी आणि मराठी साहित्याची निर्मिती यांचा अनुबंध स्पष्ट करा.

**2.** संस्कृतीची विविध अंगे व साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा-प्रवाहांचा परामर्श घ्या.

**किंवा**

मराठी साहित्य व महाराष्ट्र संस्कृती यांचा परस्परसंबंध अधोरेखित करा.

**3.** साहित्यप्रसाराची मध्ययुगीन माध्यमे कोणती होती यांचा सविस्तर आढावा घ्या.

**किंवा**

वारकरी सांप्रदायाचा तत्कालीन समाजजीवनावर कोणता प्रभाव पडला ते विशद करा.

**4.** 'शिवकालीन साहित्य निर्मितीतून स्वधर्मजागृती व सामाजिक प्रबोधन होत गेले' या विधानाचा परामर्श घ्या.

munotes.in

**किंवा**

'मध्ययुगीन मराठी वाङ्मयाने मराठी वाचकांची अभिरुची समृद्ध केली आहे' याची चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) लावणीचे भाषासौंदर्य

(ब) भक्तीचळवळ व महाराष्ट्राची संस्कृती

(क) समर्थ संप्रदायाचे योगदान

(ड) तमाशा महाराष्ट्राचे वैभव।

munotes.in

# [5402]-104

## (3) तौलनिक साहित्याभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** तौलनिक साहित्याभ्यासाचे सामर्थ्य व मर्यादांचा आढावा घ्या.

**किंवा**

तौलनिक साहित्याभ्यासाची आवश्यकता स्पष्ट करा.

**2.** 'प्रभव आणि प्रभाव' संकल्पनांचे स्वरूप स्पष्ट करून त्यांचे उपयोजन कसे केले जाते ते लिहा.

**किंवा**

'राष्ट्रीय साहित्य' ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**3.** तौलनिक साहित्याभ्यासात विश्वसाहित्य संकल्पनेचा उपयोग कसा होतो, ते लिहा.

**किंवा**

विश्वसाहित्यकृतीची सामर्थ्यस्थळे कोणती, ते विशद करा.

**4.** काझी सलीम व मर्ढेकरांच्या काव्यातील साम्यस्थळांचा परामर्श घ्या.

**किंवा**

''काझी सलीम व मर्ढेकरांचे काव्यविश्व प्रतिमांनी समृद्ध केलेले आहे'' या विधानाचा परामर्श घ्या.

munotes.in

**5.** टिपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(1) तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना

(2) ‘विश्वसाहित्य’ संकल्पना

(3) सलीम काझी यांच्या कवितेतील प्रतिमाविश्व

(4) मर्ढेकरी कवितेतील संसृति टिका.

munotes.in

## (4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** इतिहासलेखनाची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासाची संकल्पना स्पष्ट करा.

**2.** वाङ्मयेतिहास व टीकाशास्त्र यातील सहसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

इतिहास व वाङ्मयेतिहास यातील अनुबंधाची चर्चा करा.

**3.** वाङ्मयेतिहास लेखनाचा उदय व विकास कसा झाला ते लिहा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासातील भारतीय विचारवंताच्या विचाराचा परामर्श घ्या.

**4.** वाङ्मयेतिहासकारासमोरील उद्दिष्टांनुसार वाङ्मयेतिहास लेखनाचे प्रकार सांगा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासलेखनाची ध्येय व उद्दिष्टे स्पष्ट करा.

munotes.in

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) वाङ्मयेतिहास लेखनाची सामुग्री

(2) वाङ्मयेतिहासाची सांस्कृतिक पार्श्वभूमी

(3) वाङ्मयाचा भूगोल

(4) गणेश देवी यांची वाङ्मयेतिहासाची संकल्पना.

munotes.in

## (5) अलंकार व छंद

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अलंकार म्हणजे काय ते संस्कृत पूर्वपीठिकेच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

''ओवी व अभंग मिळून मराठीत एक छंदसमुद्रच आहे'' या वि.का. राजवाडे यांच्या विधानाची चर्चा करा.

**2.** अलंकाराच्या वर्गीकरणाची तत्त्वे कोणती ते स्पष्ट करा.

**किंवा**

प्राचीन छंदाचे स्वरूप व प्रकार सोदाहरण सांगा.

**3.** अलंकाराचे काव्यरचनेतील स्थान सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

मराठीतील अभंग या छंदाची साधक-बाधक चर्चा करा.

**4.** अलंकार व वक्रोक्ती यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

मुक्त छंदाचे स्वरूप व वाटचाल विशद करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) विश्वनाथाचा अलंकार विचार

(2) प्रतिमा आणि अलंकार

(3) ना. ग. जोशी यांचे छंदशास्त्रीय कार्य

(4) ओवी या छंदाची रचनावैशिष्ट्य.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5402]-201

## M.A. (Part I) (II Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### (अभ्यासपत्रिका क्र. 1, व्यावहारिक व उपयोजित मराठी, भाग-2)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भाषांतराची आवश्यकता स्पष्ट करून भाषांतराच्या प्रकारांचा सोदाहरण परिचय करून द्या.

**किंवा**

खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

Failure is the first step of success. Never give up after you fail. Failure is the first step of success, as they say. If you don't fail, then you wouldn't succeed. Learn from your failures. After you learn from your failures, you have a better chance to change failure into success. Never look down to it. No matter how many times you fail, if you never give up, you'll succeed in life. Keep in mind all successful people also failed before.

Michael Jordan, a famous football player says, "I can accept failure, everyone fails at something. But I can't accept not trying."

This gives us a moral message that failure is acceptable but you have to try. Keep trying and work hard to achieve your goal. Failure teaches you to learn and improve from your mistakes. Failure is not a bad thing, it leads to success.

P.T.O.

munotes.in

**2.** विविध कार्यक्रमांचे आयोजन-नियोजन करताना कोणकोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात ते स्पष्ट करा.

**किंवा**

प्रभावी सूत्रसंचालनासाठी निवेदकाकडे कोणकोणत्या गुणांची आवश्यकता असते ? ते विशद करा.

**3.** शासन, विद्यापीठे, बँका, कंपन्या यांच्या कार्यालयीन कामकाजासंदर्भात माहिती व जनसंपर्क अधिकाऱ्याचे स्थान महत्त्वपूर्ण असते—चर्चा करा.

**किंवा**

जनसंपर्क अधिकाऱ्याची कार्यपद्धती स्पष्ट करून जनसंपर्काची तंत्रे व आवश्यकता सांगा.

**4.** प्रकल्पलेखनाचे स्वरूप स्पष्ट करून प्रकल्पलेखनातील क्षेत्रीय पद्धतीचे महत्त्व विशद करा.

**किंवा**

'दै. सकाळ' च्या मुद्रणालय व वृत्तपत्रकार्यालयास भेट दिलेल्या माहितीच्या आधारे प्रकल्प आराखडा तयार करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) जनसंपर्क अधिकाऱ्याची पथ्ये

(ब) दृक-श्राव्य माध्यमातील मराठी भाषा

(क) पारितोषिक वितरण समारंभ-कार्यक्रमपत्रिका

(ड) अनुवादकापुढील आव्हाने.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5402]-202

## M.A. (Part I) (II Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 2

### अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1920 ते 1960)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

**1.** 1920 ते 1945 या कालखंडातील समीक्षालेखनाचा आढावा घ्या.

**किंवा**

1945 ते 1960 या कालखंडातील मराठी लघुकथेची वाटचाल स्पष्ट करा.

**2.** 1920 ते 1945 या कालखंडातील नाट्यलेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

**किंवा**

1945 ते 1960 या कालखंडातील काव्यलेखनाची स्थित्यंतरे स्पष्ट करा.

**3.** 1920 ते 1945 या काळातील ललितगद्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

1945 ते 1960 या कालखंडातील वि.स. खांडेकर यांच्या कादंबरीलेखनाचा आढावा घ्या.

**4.** 1920 ते 1960 या कालखंडातील स्त्रियांच्या कथालेखनाचा आढावा घ्या.

**किंवा**

1945 नंतरच्या मराठी विनोदी कथा वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) मराठी लघुकथेची वैशिष्ट्ये

(2) बहिणाबाई चौधरी यांचे काव्यलेखन

(3) रणांगण—विश्राम बेडेकर

(4) अरविंद गोखले यांची कथा.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5402]-203

**M.A. (Part I) (II Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 3**

**(भाषाविज्ञान : सामाजिक)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. सामाजिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा, बोली आणि समाज यांचा अनुबंध विशद करा.

2. विविध व्यवसाय क्षेत्रातील भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

भाषेचा लिंगभेदानुसारी विशिष्ट वापर कसा होतो ते उदाहरणासह विशद करा.

3. समाजाच्या सांस्कृतिक विकासातील भाषेचे योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा, तिची आर्थिक वर्गव्यवस्था आणि जाती वर्गव्यवस्था या तीन घटकांचा समाजभाषा विज्ञानदृष्ट्या विचार करा.

4. प्रमाणभाषेवर होणारा परभाषा संपर्काचा परिणाम विशद करा.

**किंवा**

समाजातील भाषिक पोटसमुह आणि त्यांच्या भाषिक गुणविशेषांची चर्चा करा.

P.T.O.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(*i*) स्त्रियांची भाषा

(*ii*) भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था

(*iii*) पिजिन भाषा

(*iv*) भाषिक लघुक्षेत्रे.

munotes.in

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| **Seat No.** | |
|---|---|

**[5402]-204**

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** अभ्यासपत्रिका सोडवावी.

(1) दलित साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या (भाग-2)

**किंवा**

(5) अलंकार, छंद आणि व्याकरण

munotes.in

**(1) दलित साहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** दलित साहित्याच्या निर्मितीमागील विविध प्रेरणांचा आढावा घ्या.

**किंवा**

दलित साहित्यातून व्यक्त होणारा सामाजिक समतेचा विचार स्पष्ट करा.

**2.** दलित साहित्यातील वेदना आणि विद्रोहाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

दलित साहित्यातून तोचतोचपणा, आक्रोश व एकसुरीपणा दिसून येतो' या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

**3.** दलित आत्मकथनांचा थोडक्यात आढावा घ्या.

**किंवा**

दलित साहित्यातील शाहिरी वाङ्‌मयाचा परिचय करून द्या.

**4.** 'दलित साहित्य हे सामाजिक बांधीलकी आणि विज्ञाननिष्ठा यांचे दर्शन घडविणारे साहित्य आहे' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

'दलित चळवळीतून दलित साहित्य उदयास आले आहे' या विधानाची चर्चा करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) दलित साहित्याचे देशीपण

(2) दलित साहित्य आणि सामाजिक बांधीलकी

(3) शंकरराव खरातांचे कथालेखन

(4) दलित समीक्षा.

munotes.in

*किंवा*

(2) मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** इंग्रजी राजवटीतील स्थित्यंतरे आणि तत्कालीन मराठी साहित्य यांचा परस्परसंबंध उलगडून दाखवा.

**किंवा**

'अव्वल इंग्रजी काळातील विविध धर्मविषयक चळवळींचा परिणाम मराठी वाङ्‌मयनिर्मितीवर झाला', या विधानाचा परामर्श घ्या.

munotes.in

**2.** 19व्या शतकातील नियतकालिकांचा उदय सामाजिक सुधारणांसाठी कसा प्रेरणादायी ठरला ? ते स्पष्ट करा.

**किंवा**

लोकहितवादींच्या शतपत्रांचा आशय उलगडून दाखवा.

**3.** स्वातंत्र्यचळवळींच्या प्रेरणेतून उदयाला आलेल्या साहित्याचा परिचय करून द्या.

**किंवा**

गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव विशद करा.

**4.** नवसाहित्यनिर्मितीमागील सामाजिक प्रेरणांचा शोध घ्या.

**किंवा**

1945 नंतरचे मराठी साहित्याचे आशयविश्व स्पष्ट करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) शेतकऱ्याचा आसूड

(ब) भाषांतर युग

(क) रोमाँटीसिझम आणि मराठी कविता

(ड) ऐतिहासिक कादंबरी

munotes.in

*किंवा*

**(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषांतर संकल्पनेचा सविस्तर परामर्श घ्या.

**किंवा**

भाषांतराचे प्रकार व कार्ये यांचा परिचय करून द्या.

**2.** ''अव्वल इंग्रजी कालखंडास भाषांतर युग असे म्हणतात'' या विधानाचा परमर्श घ्या.

**किंवा**

ललित साहित्याचे भाषांतर करताना येणाऱ्या अडचणींचा परामर्श घ्या.

**3.** 'हवेली' वेव्हरलेची या कादंबरीच्या स्थल-काल वैशिष्ट्यांचे सोदाहरण विवेचन करा.

**किंवा**

'' 'हवेली' वेव्हरलेची ही कादंबरी रंजनात्मक कादंबरी आहे'' या विधानाचा परामर्श घ्या.

**4.** 'तुंबाडचे खोत' कादंबरीच्या व्यक्तिचित्रण कौशल्यांचा आढावा घ्या.

**किंवा**

'तुंबाडचे खोत' या कादंबरीच्या भौगोलिक सामर्थ्याचे विवेचन करा.

munotes.in

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(1) रूपांतर संकल्पना

(2) आदर्श भाषांतर कर्त्याचे गुण

(3) कथेचे भाषांतर : अडचणी

(4) 'तुंबाडचे खोत' मधील मध्यवर्ती व्यक्तिरेखा.

munotes.in

*किंवा*

**(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या (भाग-2)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मराठी वाङ्मयाचा भारतक्षेत्रीय अभ्यास व इतिहास स्पष्ट करा.

**किंवा**

अर्वाचीन मराठी वाङ्मय व मराठी वाङ्मयेतिहासाचा परामर्श घ्या.

**2.** भारतीय वाङ्मयेतिहासाची संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास लेखनातील समस्या व अडचणींचा आढावा घ्या.

**3.** ल.रा. नसिराबादकर या वाङ्मयेतिहासकारांचे कार्य स्पष्ट करा.

**किंवा**

माटे-बेडेकर यांचा मराठी वाङ्मयेतिहास संबंधीचा विचार सांगा.

**4.** वि.ल. भावे ते म.सा.प. प्रकल्पातील वाङ्मयेतिहासाचे समालोचन करा.

**किंवा**

1947 पर्यंतच्या मराठी वाङ्मयेतिहासाचा आढावा घ्या.

munotes.in

**5.** कोणत्याही **दोहोंवर** टिपा लिहा :

(1) वाङ्मयेतिहासलेखनाचा तात्विक विचार

(2) मध्ययुगीन वाङ्मयेतिहास लेखनातील अडचणी

(3) 1947 नंतरच्या वाङ्मयेतिहास लेखनाची वाटचाल

(4) स.गं. मालशे यांचे वाङ्मयेतिहास लेखन.

munotes.in

*किंवा*

## (5) अलंकार, छंद आणि व्याकरण

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** व्याकरण म्हणजे काय ते सांगून व्याकरणाच्या मर्यादा सांगा.

**किंवा**

मराठी व्याकरणासंबंधी अभ्यासकांनी मांडलेल्या मतांची चर्चा करा.

**2.** व्याकरण आणि भाषा यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

भाषेत व्याकरणाचा उपयोग कसा केला जातो ते स्पष्ट करा.

**3.** आदेशात्मक व वर्णनात्मक व्याकरणाची चर्चा करा.

**किंवा**

व्याकरणाचे विविध टप्पे कोणते ते सांगा.

**4.** मराठीतील व्याकरणविषयक चिंतनाचा परामर्श घ्या.

**किंवा**

मराठी व्याकरणातील वाक्यविचाराची चर्चा करा.

munotes.in

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) मराठीची व्यंजन व्यवस्था

(2) विभक्ती प्रत्यय

(3) तुलनात्मक व्याकरण

(4) मो.के. दामले यांचे शास्त्रीय मराठी व्याकरण

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5402]-301

## M.A. (Part II) (III Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 5

### (प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. वृत्तसंस्कृतीचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

**किंवा**

'फिचर रायटिंग' म्हणजे काय ? ते सांगून आरोग्यविषयक फिचर लेखन करा.

2. कलानिहाय सर्जनात्मक आस्वादाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

नाटकाचे आस्वादलेखन करतांना आस्वादकाला कोणकोणत्या बाबी विचारात घ्याव्या लागतात, त्याची चर्चा करा.

3. व्यक्तिपरिचय व व्यक्तिवेध यातील फरक सांगून तुमच्या परिसरातील एका साहित्यिकाचा परिचय करून द्या.

**किंवा**

तुम्ही वाचलेल्या कोणत्याही **एका** ग्रंथाचे परीक्षण लिहा.

4. दृक्श्राव्य माध्यमातील विविध कार्यक्रम प्रकारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

श्राव्य माध्यमासाठी संहिता लेखन करतांना आवश्यक असणाऱ्या भाषिक कौशल्यांची चर्चा करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) क्रीडा पत्रकारिता

(ब) सर्जनात्मक लेखन

(क) दृक्श्राव्य माध्यमासाठीचे लेखनतंत्र

(ड) संगीत कलेचे आस्वादलेखन.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

**[5402]-302**

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 6**

**साहित्य-समीक्षा व संशोधन**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

**1.** समीक्षेची संकल्पना स्पष्ट करून त्याची प्रयोजने लिहा.

**किंवा**

साहित्याचे मूल्यमापन करण्यासाठी साहित्याचे आकलन व आस्वाद कसे उपयुक्त ठरते ते लिहा.

**2.** आदर्श समीक्षकाची साधना ही संकल्पना सविस्तर विशद करा.

**किंवा**

समीक्षकाजवळ कोणते तारतम्य असावे ? ते स्पष्ट करा.

**3.** साहित्याचा चरित्रात्मक समीक्षापद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

आदिबंधात्मक समीक्षापद्धतीचे सामर्थ्य व मर्यादा स्पष्ट करा.

**4.** 'इ.स. 1920 पर्यंतच्या समीक्षेने मराठी समीक्षेचा पाया रचला आहे' या विधानाचा परामर्श घ्या.

P.T.O.

**किंवा**

स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचे स्वरूप बदलत गेले याची साधार चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) समीक्षेतील वाचकाचे स्थान

(2) वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये

(3) ऐतिहासिक समीक्षापद्धती

(4) समीक्षक न. चिं. केळकर

munotes.in

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| **Seat No.** | |
|---|---|

**[5402]-303**

**M.A. (Part-II) (Third Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-7**

**विशेष लेखकाचा अभ्यास (प्राचीन/अर्वाचीन)**

**(प्राचीन-संत तुकाराम)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

**1.** संत तुकारामांचे चरित्र त्यांच्या अभंगांद्वारे साधार लिहा.

**किंवा**

'संत तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांचे व्यावहारिक-पारमार्थिक आत्मचरित्र होय' सोदारहण स्पष्ट करा.

**2.** 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंर्तबाह्य जग आणि मन' या अभंगाचे मर्म उलगडून दाखवा.

**किंवा**

संत तुकारामाच्या अभंगांतील त्यांच्या साधकावस्थेचे स्वरूप विशद करा.

**3.** कर्मकांड, अंधश्रद्धा व भोंदूगिरी यांचे संत तुकारामांनी अभंगांतून कशा पद्धतीने वास्तव दर्शन घडविले आहे ? ते स्पष्ट करा.

**किंवा**

'संत तुकारामांची अभंगवाणी म्हणजे लोकजागृतीचे व्यासपीठ होय' साधार स्पष्ट करा.

**4.** अणुरेणूया थोकडा। तुका आकाशा एवढा ॥ या अभंगातून संत तुकारामांचे व्यापकपण स्पष्ट करा.

**किंवा**

'तुका झालासे कळस' या विधानाची समर्पकता सिद्ध करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) संत तुकोबांच्या अभंगांतील पंढरीमाहात्म्य

(*ii*) धर्मसुधारक : संत तुकाराम

(*iii*) 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ! पक्षी ही सुस्वरे आळविती' या अभंगातील भावार्थ

(*iv*) संत तुकारामांच्या अभंगांतील सुभाषिते.

munotes.in

# [5402]-303

**(अर्वाचीन—द.ता. भोसले)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** डॉ. द.ता. भोसले यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण विशद करा.

**किंवा**

एक समर्थ ग्रामीण लेखक म्हणून द.ता. भोसले यांचा परिचय करून द्या.

**2.** डॉ. द.ता. भोसले यांच्या कथांमधील पात्रांचे स्वभावविशेष साधार सांगा.

**किंवा**

'जन्म' आणि पाऊस या कथासंग्रहांची वैशिष्ट्ये विशद करा.

**3.** 'मी आणि माझा बाप' कादंबरीतील पात्रांचे स्वभावविशेष साधार सांगा.

**किंवा**

'इथे फुलांना मरण जन्मता' या कादंबरीचे मूल्यमापन करा.

**4.** 'पार आणि शिवार' या ललित लेखनातील ग्रामीण जीवन-वास्तव उलगडून दाखवा.

**किंवा**

'बाळमुठीतील दिवस' या ललितलेखनाची वैशिष्ट्ये साधार लिहा.

munotes.in

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) 'अंग अंग म्हशी' मधील भाषाशैली

(*ii*) 'पाळत' मधील कथानक

(*iii*) 'परिघावरची माणसं' मधील व्यक्तिचित्रे

(*iv*) 'आठवणीतला दिवस'चे कथानक

munotes.in

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5402]-304

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र.-8 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही एक प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) लोकसाहित्याची मुलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

***किंवा***

(2) सौंदर्यशास्त्र

***किंवा***

(3) लेखनविद्या व निबंध लेखन

***किंवा***

(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

***किंवा***

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

## (1) लोकसाहित्याची मुलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** लोकसाहित्याची विविध प्रयोजने स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्य म्हणजे काय ते सांगून लोकसाहित्याची आस्वादकता स्पष्ट करा.

P.T.O.

**2.** लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध संप्रदाय स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासाची वाटचाल स्पष्ट करून त्यातील अडचणी सांगा.

**3.** लोकसाहित्यातील 'लोकसमजुती, रूढी-परंपरा व विधी-विधाने' या विषयी साधार माहिती लिहा.

**किंवा**

लोकसाहित्य व अर्वाचीन साहित्य यांच्या संबंधाचे विश्लेषण करा.

**4.** लोकसाहित्याच्या सादरीकरणातून व्यक्त होणारे लोकजीवन स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासातील आधुनिक काळातील विविध प्रयत्न स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) दैवतकथा

(2) लोककला व प्रबोधन

(3) लोकसाहित्याच्या अभ्यासाची प्राचीन परंपरा

(4) उखाणे.

munotes.in

# [5402]-304

## (2) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** सौंदर्यशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र व नवे शोध याविषयी सविस्तर माहिती लिहा.

**2.** द्विध्रुवात्मकतेची सौंदर्यविधानाच्या संदर्भात चर्चा करा.

**किंवा**

सौंदर्यविधान आणि नीतिविधान यांची तुलना करा.

**3.** विविध सौंदर्य सिद्धांताचा परिचय करून द्या.

**किंवा**

बा. सी. मर्ढेकरांच्या लयसिद्धांताची चिकित्सा करा.

**4.** सौंदर्यानुभवाची विविधता व स्वायत्तता स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यानुभवातील वैश्विकतेचे स्वरूप विशद करा.

munotes.in

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) सौंदर्यशास्त्र आणि समीक्षासंकल्पना

(2) सौंदर्यविधान व मूल्यविधान

(3) भावनानिष्ठतेचा सिद्धांत

(4) सौंदर्यानुभवाची भावना.

munotes.in

# [5402]-304

## (3) लेखनविद्या व निबंध लेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवन व्यवहारातील भाषा वापराचे महत्त्व विशद करा.

**किंवा**

मानवी जीवन व्यवहारात भाषेचा वापर कसा होतो ते सविस्तर लिहा.

**2.** 'प्रभावी संवादप्रक्रियेसाठी भाषेचे स्थान महत्त्वाचे असते' या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

मराठी साहित्याच्या विविध प्रकारातील संवादाचे स्वरूप व महत्त्व लिहा.

**3.** साहित्याची भाषा व व्यवहाराची भाषा यातील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

भाषेची प्रगत तंत्रसाधने आणि संवाद सुविधा यावर झालेल्या परिणामांची साधार चर्चा करा.

**4.** वाङ्मयीन संवादप्रक्रियेचे स्वरूप कसे असते ते सोदाहरण स्पष्ट करा.

munotes.in

**किंवा**

संवादप्रक्रियेतील प्रमुख घटक कोणते ते सांगून संवादप्रक्रियेतील अडथळ्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) प्रगत भाषा कौशल्ये

(ब) आर्थिक क्षेत्रातील मराठी भाषेचे स्वरूप

(क) भाषा : चिन्ह व्यवस्था

(ड) संभाषण कौशल्य.

munotes.in

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 19व्या शतकाच्या पूर्वार्धात निर्माण झालेल्या वैचारिक साहित्याचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

वि.दा. सावरकर व विनोबा भावे यांच्या वैचारिक साहित्याची चर्चा करा.

**2.** वैचारिक साहित्याची संकल्पना स्पष्ट करून वैचारिक साहित्यनिर्मितीची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

'मराठीतील प्रारंभीचे वैचारिक साहित्य समाजसुधारणेसाठी प्रेरक होते' कसे ते स्पष्ट करा.

**3.** बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी व महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांची चर्चा करा.

**किंवा**

राष्ट्रवादाशी संबंधित मराठी निबंध वाङ्मयाचा आढावा घ्या.

munotes.in

**4.** न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर व विठ्ठल रामजी शिंदे यांच्या लेखनातील वैचारिकता स्पष्ट करा.

**किंवा**

महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मसुधारणाविषयक विचारांची चर्चा करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

(ब) 'गीतारहस्य'

(क) बुद्धिप्रामाण्यवाद आणि आगरकरांचे साहित्य

(ड) विनोबा भावे यांची भूदान चळवळ.

munotes.in

# [5402]-304

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप उलगडून दाखवा.

**किंवा**

साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेसंबंधी भारतीय विचारवंतांनी मांडलेल्या मतांचा परामर्श घ्या.

**2.** 'कविता' या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

'चरित्र' व 'आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकारातील भेद सांगून त्यांचे स्वरूप विशद करा.

**3.** साहित्य प्रकारांची जाणीवपूर्वक निर्मिती करताना पूर्वतयारी म्हणून कोणत्या गोष्टी कराव्या लागतात, ते लिहा.

**किंवा**

प्रकारनिष्ठ साहित्यनिर्मितीचे फायदे व तोटे साधार स्पष्ट करा.

**4.** 'साहित्य प्रकार निर्मितीत पूर्वपरंपरेचे ज्ञान व समकालीन परिस्थितीचे भान महत्त्वाचे ठरते' या विधानाची चर्चा करा.

munotes.in

**किंवा**

नाट्य वाङ्मय प्रकाराच्या भाषेची विविधता व महत्व स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) साहित्य सर्जनविषयक सिद्धांत

(2) निबंध वाङ्मय प्रकाराचे विशेष

(3) विविध साहित्य प्रकार

(4) स्वैर साहित्य निर्मिती.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5402]-401

**M.A. (Part II) (IV Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 5**

**(प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. वृत्तसंकलनाची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्य व लोककलेचे वृत्तसंकलन करताना कोणती पथ्ये पाळावी लागतात, ते सांगा.

2. 'माध्यमानुसार जाहिरात संहिता लेखनाचे स्वरूप बदलते' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

दृक्-श्राव्य माध्यमासाठी जाहिरात संहिता लिहिताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्या लागतात, ते सोदाहरण स्पष्ट करा.

3. पटकथेची संकल्पना स्पष्ट करून 'स्त्री-सन्मान' या विषयावर पाच मिनिटाची पटकथा लिहा.

**किंवा**

नभोनाट्याचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

4. साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करून नाटक प्रकाराचे विशेष लिहा.

**किंवा**

कादंबरीचे पटकथेत रूपांतर करताना करावे लागणारे बदल विशद करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) निसर्ग आणि पर्यावरणविषयक वृत्तसंकलन

(2) जाहिरात : एक कला

(3) कथा व पटकथा

(4) रूपांतर कौशल्य.

munotes.in

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5402]-402

## M.A. (Part II) (IV Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 6

### (साहित्य-समीक्षा व संशोधन)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. संशोधकाच्या अंगी कोणते गुणविशेष असावेत ? साधार स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या संशोधनात नियतकालिके, कोशवाङ्मय, हस्तलिखिते आणि वृत्तपत्रे या साधनांचे महत्त्व अधोरेखित करा.

2. लोकसाहित्य व लोकसंस्कृती यांचा अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

संशोधनातील कालखंडाच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करा.

3. संशोधनासाठी इतर ज्ञानशाखांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. हे साहित्याच्या अनुषंगाने स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या संशोधनासाठी समाजशास्त्र व राज्यशास्त्र अभ्यासाचे महत्त्व साधार लिहा.

P.T.O.

4. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या संशोधनाचा आढावा घ्या.

**किंवा**

भाषाविषयक संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) संशोधनाच्या प्रेरणा

(2) संशोधन प्रक्रिया टप्पे

(3) साहित्य व संस्कृती अनुबंध

(4) डॉ. विश्वनाथ शिंदे यांचे लोकसाहित्यविषयक संशोधनकार्य.

munotes.in

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**3**

| Seat No. | |
|---|---|

# [5402]-403

## M.A. (Part II) (IV Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक - 7

### विशेष लेखकाचा अभ्यास (प्राचीन/अर्वाचीन)

### (प्राचीन - संत तुकाराम)

### (2008 PATTERN)

munotes.in

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संत तुकारामांच्या अभंगांचे वेगळेपण आपल्या शब्दात लिहा.

**किंवा**

संत तुकारामांच्या अभंगांतील रचनाशैलीचे स्वरूप साधार विशद करा.

2. संत तुकारामांच्या अभंगात आलेल्या बोलींचे वेगळेपण स्पष्ट करा.

**किंवा**

संत तुकारामांच्या अभंगांचे भाषिक अंगाने मूल्यमापन करा.

3. 'आम्ही जातो आमुच्या गावा। आमुचा राम राम घ्यावा॥'
या संत तुकारामांच्या अभंगातीला भावार्थ उलगडून दाखवा.

**किंवा**

संत तुकारामांच्या अभंगांतून तत्कालीन लोकजीवन कसे व्यक्त झाले आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

P.T.O.

**4.** एक बंडखोर संत कवी म्हणून संत तुकारामांची ओळख करून द्या.

**किंवा**

'शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी।' या संत तुकारामांच्या अभंगाचा भावार्थ साधार स्पष्ट करा.

**5.** खालीलपैकी **दोहों**वर टिपा लिहा :

(1) तुकोबांच्या अभंगांतील आत्माविष्कार

(2) संत तुकारामांच्या अभंगांतील विद्रोह

(3) संत तुकारामांच्या अभंगांतील विठ्ठल माहात्म्य

(4) संत तुकारामांच्या अभंगांतील समाज प्रबोधन

munotes.in

# [5402]-403

**अर्वाचीन—डॉ. द.ता. भोसले**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'ग्रामीण बोलीचा शब्दकोश'—निर्मितीमागील लेखकाची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

'कुमारांचे कर्मवीर' या पुस्तकातून कर्मवीरांच्या कार्यकर्तृत्त्वाचा वेध द.ता. भोसलेंनी कसा घेतला आहे ? ते सांगा.

2. संत गाडगे बाबांच्या लोकोत्तर कार्याचा आढावा द.ता. भोसलेंनी कसा घेतला आहे ? ते स्पष्ट करा.

**किंवा**

लोकजीवनाचा वेध द.ता. भोसले यांनी 'संस्कृतीच्या पाऊलखूणांमधून' कसा घेतला आहे ? ते लिहा.

3. 'लोकसंस्कृती : स्वरूप व विशेष'चे परीक्षण करा.

**किंवा**

एक ग्रामीण लेखक म्हणून द.ता. भोसलेंचे वेगळेपण विशद करा.

4. ग्रामीण साहित्याचे एक समीक्षक म्हणून द.ता. भोसलेंचा परिचय करून द्या.

**किंवा**

'ग्रामीण साहित्य : एक चिंतन' या द.ता. भोसले यांच्या समीक्षा ग्रंथाचे मूल्यमापन करा.

5. खालीलपैकी **दोहों**वर टिपा लिहा :

(1) संत गाडगे महाराजांची कीर्तन शैली

(2) लोकसंस्कृतीतील लोकपरंपरा

(3) ग्रामसंस्कृतीतील : कृषिजीवन

(4) डॉ. द.ता. भोसले यांचे समाजचिंतन.

munotes.in

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| Seat No. | |
|---|---|

# [5402]-404

## M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2018

### MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)

### (2008 PATTERN)

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** अभ्यासपत्रिका सोडवावी.

(1) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

**किंवा**

(2) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(3) लेखनविद्या व निबंधलेखन

**किंवा**

(4) मराठीचे वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

munotes.in

### (1) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मराठी लोकगीतांचे स्वरूप स्पष्ट करून स्त्रीगीतांमधील वैविध्य व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

'लोकगीतातून मराठी संस्कृतीचे विविधांगी दर्शन घडते' कसे ते सांगा.

**2.** लोककलांच्या सादरीकरणातील कलात्मक सौंदर्य विशद करा.

**किंवा**

कीर्तनपरंपरेचे स्वरूप व प्रकार यांची चर्चा करा.

**3.** लोकगीतांचा संतकाव्याशी असणारा अनुबंध सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसंस्कृतीच्या उपासकांचे वाङ्‌मयीन व सांस्कृतिक योगदान स्पष्ट करा.

**4.** लोकसाहित्याच्या क्षेत्रातील सरोजिनी बाबर आणि प्रभाकर मांडे यांचे योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यास संस्थाचा सविस्तर परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) कलगीतुरा

(2) लोककथा—उत्पत्तीसंबंधी विचार

(3) दुर्गा भागवतांचे कार्य

(4) विधिगीते.

munotes.in

*किंवा*

(2) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवशास्त्रीय भावना व सौंदर्यभावना यातील भेद स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यभावनेचे स्वरूप व कार्य स्पष्ट करा.

**2.** सेंद्रिय एकात्मतेच्या सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'रूपा'ची संकल्पना ही स्थलकालसंस्कृती सापेक्ष कशी आहे, याची साधार मीमांसा करा.

**3.** 'चांगली कला आस्वादकाला भावनेचा संसर्ग करते' या टॉलस्टायच्या मताचे साधार स्पष्टीकरण करा.

**किंवा**

विरेचन-सिद्धांताचे स्वरूप व मर्यादा लिहा.

**4.** सौंदर्यशास्त्र आणि साहित्य यातील संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र आणि समीक्षाशास्त्र यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

munotes.in

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) कांटची सौंदर्यमीमांसा

(ब) कलाकृतीचे अर्थपूर्ण रूप

(क) परिणामकारक संदेशन

(ड) सौंदर्यशास्त्राभ्यास आणि समीक्षा क्षमता.

munotes.in

*किंवा*

**(3) लेखनविद्या व निबंधलेखन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** आजच्या जीवन व्यवहारात मराठी भाषेचे नेमके स्थान कसे आहे ते लिहा.

**किंवा**

'ग्रामीण जीवन व्यवहारात ग्रामीण बोलीचा अधिक प्रमाणत वापर होतो.' साधर चर्चा करा.

**2.** साहित्याची भाषा व प्रसार माध्यमांची भाषा यातील भेद स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या भाषेची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**3.** आकाशवाणी या प्रसार माध्यमासाठी लेखन करताना भाषेची कोणती पथ्ये पाळावीत ते लिहा.

**किंवा**

जाहिरातीतील मराठीचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

**4.** जनसंपर्कासाठी भाषिक कौशल्याची आवश्यकता असते, कसे ते लिहा.

**किंवा**

निबंधाचे प्रकार सांगून कल्पनात्मक निबंधाची गुणवैशिष्ट्ये लिहा.

munotes.in

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) निबंधलेखनातील तर्कशुद्धता

(ब) भाषा : चिन्ह व्यवस्था

(क) संवाद आणि प्रसारमाध्यमे

(ड) इंटरनेटवरील मराठी भाषा

munotes.in

*किंवा*

**(4) मराठीचे वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याच्या सामाजिक अभ्यास म्हणजे काय ? ते सांगून त्याची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याचा सामाजिक अभ्यासाचे हेतू स्पष्ट करा.

**2.** 'लेखकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण समाजातच होत असते' या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

लेखकाची जीवनदृष्टी आणि सामाजिक पर्यावरण यांतील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**3.** कालतत्त्व हा घटक साहित्यनिर्मितीला कसा प्रभावित करतो ? त्याची चर्चा करा.

**किंवा**

विविध वाङ्मयप्रकारांची निर्मिती व त्यामागील प्रयोगशीलता कशी प्रत्ययाला येते ते लिहा.

**4.** साहित्य परंपरा आणि समाज यामधील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

सामाजिक चळवळी व साहित्यनिर्मिती यांचा सहसंबंध स्पष्ट करा.



munotes.in

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) सामाजिकता आणि कलामूल्ये

(ब) सामाजिकता व शैली

(क) साहित्यनिर्मिती प्रक्रिया

(ड) वाचक व साहित्य सहसंबंध

munotes.in

*किंवा*

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्यनिर्मितीतील प्रतिभेचे स्वरूप व कार्ये स्पष्ट करा.

**किंवा**

'साहित्यकृती ही वास्तवाच्या पायावर उभारलेली कल्पनेची इमारत असते', या मताची चर्चा करा.

**2.** सर्जनशील निर्मितीचे स्वरूप स्पष्ट करून स्फूर्ती, अभ्यास व बहुश्रुतता यांचे महत्व विशद करा.

**किंवा**

भरतमुनीच्या रससिद्धांताचा परिचय करून द्या.

**3.** समाज, काल व भाषा यांच्या साहित्यनिर्मितीशी असलेल्या संबंधांचे विवेचन करा.

**किंवा**

साहित्यनिर्मिती संदर्भात पाश्चात्य मीमांसकांनी मांडलेल्या विचारांचा परामर्श घ्या.

**4.** लेखक व वाचकनिष्ठ प्रयोजनांचा परिचय करून द्या.

munotes.in

**किंवा**

साहित्यनिर्मिती संदर्भातील कलावादी व जीवनवादी भूमिका स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील समस्या

(ब) साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील प्रसारमाध्यमांचे महत्व

(क) साहित्यनिर्मिती आणि लेखक

(ड) क्षेमेंद्राचा औचित्यविचार.

munotes.in